# जा हि रा त

जिल्हा न्यायालय, कोल्हापूर या आस्थापनेवर सफाईगार या एकुण ८ पदाची (४ निवड व ४ प्रतिक्षायादी) भरती करणेची आहे. सदरची जाहिरात, अर्जाचा नमुना व आवश्यक सुचना ecourts.gov.in/kolhapur या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तसेच कोल्हापूर जिल्हयातील सर्व न्यायालयांतील (तालुका न्यायालयांसहीत) सुचना फलकावर प्रसिध्द केल्या आहेत. तरी इच्छूक उमेदवारांनी वरील संकेतस्थळावर किंवा सुचना फलकावरील जाहिरात पाहून अर्ज करावेत.

प्रबंधक<br>
जिल्हा न्यायालय, कोल्हापूर

वाचले :– १. मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील पत्र जा.क्र. B (Gen)-5601/57/2017/60 dated 16/01/2017.

२. महाराष्ट्र शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक एसआरव्ही/२०१५/प्र.क्र. ४०४/कार्या.१२ दिनांक २५/०४/२०१६

# पा हि जे त.

कोल्हापूर येथील जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवर सफाईगार (स्वीपर) पदासाठी एकुण ०४ जागांची निवड व ०४ जागांची प्रतिक्षा यादी तयार करावयाची आहे. त्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरहू पदासाठी इच्छुक उमेदवारांनी खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे.

(वेतनश्रेणी ४४४०–७४४०, अधिक ग्रेड वेतन १३००/–)

१. पात्रता :–उमेदवार हा सुदृढ व संबंधित कामाची जबाबदारी पेलण्यास सक्षम व लायक असावा.

२. वयोमर्यादा :–उमेदवार हा दिनांक ०१.०१.२०१७ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेला व त्याचे कमाल वय ३८ वर्षापेक्षा जास्त असु नये. तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षाने शिथील म्हणजे ४३ वर्षे राहील.

(१) वरील पात्रता असणा–या उमेदवारांनी आपले अर्ज खाली दिलेल्या विहीत नमुन्यातच " प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर " यांच्या नावे निटनेटका भरुन आर.पी.ए.डी. ने दिनांक <u>०४.०२.२०१७</u> अखेर कार्यालयीन वेळेत म्हणजेच <u>सायंकाळी ६.०० पूर्वी</u> या कार्यालयात प्राप्त होतील अशा बेताने पाठवावेत. सदर मुदतीनंतर व वेळेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

मुदतीत न आलेले अर्ज व जाहिरातीतील सर्व अटींची पूर्तता न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अगर त्याबद्दल कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही. अर्जदाराने स्वत: आणून दिलेले अर्ज स्विकारले जाणार नाही. तसेच कुरीअर / स्पीड पोष्ट किंवा साध्या डाकेने पाठविलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

(२) अर्जावर उजव्या बाजूस अर्जदार याने स्वाक्षरी केलेला ओळखपत्र आकाराचा एक अदयावत फोटो लावणे आवश्यक आहे.

(३) अर्जासोबत जन्मतारखेबाबत व जातीबाबत तसेच जरुर त्या प्रमाणपत्राच्या ख—या नकला राजपत्रित अधिकारी (गॅझेटेड ऑफिसर) अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी अथवा नोटरी यांनी त्यांच्या सही शिक्क्याने सांक्षाकित केलेल्या जोडाव्यात. मूळ कागद अर्जासोबत पाठवू नयेत तसे मुळ दस्ताऐवज पात्र उमेदवारांनी तपासणीसाठी मुलाखती वेळेस हजर करणे बंधनकारक आहे.

(४) अर्जदार ज्या परिसरात राहात असेल, तेथील २ प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेले अर्जदाराच्या चारित्र व वर्तणुकीबाबतचे अदयावत दाखल्यांच्या प्रती अर्जास जोडणे आवश्यक आहे.

(५) अर्जदार हा निर्व्यसनी असावा तसेच त्याच्यावर कोणत्याही प्रकारची फौजदारी कारवाई झालेली नसावी, अगर तो कोणत्याही फौजदारी गुन्हयात गुंतलेला नसावा.

(६) अर्जदाराने अर्जातील स्वत:ची माहिती सुवाच्च हस्ताक्षरात अचुक भरावी. प्रत्येक अर्जदार उमेदवाराने या प्रक्रियेत एकच अर्ज सादर करावा. दोन किंवा जास्त अर्ज आलेस त्यास अग्राहय मानले जाईल.

(७) अर्जदाराने अर्ज पाठविते वेळी पाकिटावर " **<u>सफाईगार पदासाठी अर्ज</u>** " असा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच सोबत स्वत:चे नांव व संपूर्ण पत्ता लिहीलेला रु ५/– चे पोष्टाचे तिकीट चिटकवलेला एक लिफाफा पाठविणे आवश्यक आहे.

(८) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही/२०००/प्र.क्र.(१७/२०००)/ बारा, दिनांक २८ मार्च २००५ च्या अन्वये नमुन्याखाली देण्यात आलेले घोषणापत्र भरुन देणे आवश्यक आहे.

(९) निवड प्रक्रियेसंदर्भात उमेदवारांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणल्यास अथवा तशा प्रकारचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास त्यास विनाविलंब अपात्र ठरविले जाईल.

(१०) निवडप्रकीयेचा पुर्ण कार्यक्रम नियमावलीसह जोडला आहे. मात्र आकस्मितरीत्या त्या तारखांमध्ये बदल झाल्यास तश्या सुचना संकेतस्थळावर तसेच जिल्हा न्यायालयाचे सुचना फलकावर प्रसिध्द होईल.

(११) वरील पदे भरती करताना सर्व संबंधित शासन निर्णयानुसार राखीव जागा आणि त्याबाबतचा अनुशेष यांचा विचार करण्यात येईल.

(१२) कोणत्याही कारणास्तव अथवा कारण न देता एक, अनेक अथवा सर्व अर्ज नामंजूर करणेचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर यांनी राखून ठेवले आहेत.

(१३) अर्जात नमुद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी असलेचे आढळल्यास अर्ज प्रथमदर्शनी फेटाळण्यात येईल व अशा उमेदवारास कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल.

(१४) सदरच्या परिक्षांकरिता अर्जदारास स्वखर्चाने यावे लागेल, त्याला कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अथवा इतर भत्ता देण्यात येणार नाही.

टीप :—

१. प्रतिक्षा यादी प्रसिध्द झाल्यापासून फक्त २ वर्षाच्या कालावधीपर्यन्त वैध राहील.

२. एका पाकिटात फक्त एकाच उमेदवाराचा अर्ज असावा. एकाहून जास्त अर्ज एका पाकिटात असल्यास सर्व अर्ज अग्राह्य ठरतील.

३. वरील सर्व अटींची पुर्तता होत नसेल तर अर्ज दप्तरी दाखल करण्यात येईल.

प्रबंधक

जिल्हा न्यायालय, कोल्हापूर

********

# जिल्हा न्यायालय, कोल्हापूर

## सफाईगार पदासाठी अर्ज

| अर्जदाराचा फोटो |
|---|

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नांव (आडनाव प्रथम) | |
| २. | अर्जदार याचा राहण्याचा आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (कायमचा / तात्पुरत्या पत्यासह) | |
| ३. | अर्जदाराची जन्मतारीख (अक्षरी व अंकी) | |
| ४. | अर्जदाराचे वर नमुद तारखेस पूर्ण वय (दिनांक ०१.०१.२०१७ रोजी) | वर्ष महीने दिवस |
| ५. | शिक्षण (असल्यास) | |
| ६. | अन्य काही विशेष अर्हता | |
| ७. | धर्म — जात व प्रवर्ग | |
| ८. | नोकरीचा पुर्वानुभव | |
| ९. | अर्जदारास राखीव प्रवर्गाचा लाभ मिळविण्याकरीता त्या प्रवर्गातून अर्ज करावयाचा आहे का ? असल्यास तपशील दयावा. | |
| १०. | अर्जदाराचे महाराष्ट्रातील न्यायीक विभागात जवळचे नातेवाईक कामास आहेत काय ? (उच्च न्यायालय व खंड पीठासह)असल्यास नातलगाचे संपूर्ण नांव, हुद्दा, कामाचे ठिकाण. | |

मी, सत्य प्रतिज्ञेवर असे लिहून देतो/ देते की, वर नमुद केलेली संपूर्ण माहिती माझे माहितीप्रमाणे आणि समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे, यात कोणत्याही प्रकारची असत्यता आढळल्यास मी याबाबतच्या कारवाईस पात्र ठरेन.

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो/ करते की, मला शासकीय सेवेकरिता अपात्र घोषीत केलेले नाही. मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझेविरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

(अर्जदाराची सही व तारीख)

अर्जासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे :— १..........

२..........

३..........

४..........

---

# प्र ति ज्ञा प त्र

नमुना — अ

(नियम ४ पहा)

मी, श्री/ श्रीमती/ कुमारी ..................................................

श्री ..........................................................यांचा/ यांची / मुलगा / मुलगी / पत्नी, वय...............वर्षे, राहणार .................................................... याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी.................................या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला .............(संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .......... आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :—

दिनांक :— अर्जदाराची सही /—

# निवडप्रक्रियेचा कार्यक्रम

| | |
|---|---|
| मंगळवार<br>२४.०१.२०१७ | स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी |
| शनिवार<br>०४.०२.२०१७ | अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख |
| सोमवार<br>१३.०२.२०१७ | प्रथमदर्शी पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर तसेच जिल्हा न्यायालयाचे सुचना फलकावर प्रसिध्द |
| शुक्रवार<br>२४.०२.२०१७<br>रविवार<br>२६.०२.२०१७<br>सोमवार<br>२७.०२.२०१७ | सफाई परिक्षा |
| सोमवार<br>२७.०२.२०१७ | पात्र उमेदवारांची मुलाखत |

{ मा. उच्च न्यायालयाच्या स्विकृतीनंतरच पात्र उमेदवारांची नांवे संकेतस्थळावर आणि जिल्हा न्यायालयाचे फलकावर प्रसिध्द करुन पात्र उमेदवारांना व्यक्तीशः कळविले जाईल. }